जाहीर नोटीस

जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचे नियंत्रणाखाली येणा –या तालुका न्यायालयांमध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कंपनीचे फोटो कॉपिअर यंत्रे पुरविणेत आलेली आहेत. सदर यंत्रांचा वार्षिक देखभाल दुरुस्ती करार दि.११/०४/२०२६ रोजी संपणार आहे. सदरची यंत्रणा सुस्थितीत रहाणेसाठी त्यांची देखभाल व आवश्यक दुरुस्ती वेळेत करुन फोटो कॉपिअर यंत्रे विना अडथळा चालू राहून न्यायालयाचे दैनंदिन कामकाजात व्यत्यय येणार नाही यादृष्टीने पुढील एक वर्षाकरीता **'वार्षिक देखभाल दुरुस्ती करार'** करणेसाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत.

अ.क्र.	न्यायालयाचे नांव	फोटो कॉपिअर यंत्रांचा तपशिल
१	दिवाणी न्यायालय (व.स्तर), सिंधुदुर्ग–ओरोस	Konica Minolta Digital Copier Model Bizhub 206
२	दिवाणी न्यायालय(क.स्तर), सावंतवाडी	Konica Minolta Digital Copier Model Bizhub 206
३	दिवाणी न्यायालय(क.स्तर), वेंगुर्ला	Konica Minolta Digital Copier Model Bizhub 206
४	दिवाणी न्यायालय(क.स्तर), कुडाळ	Konica Minolta Digital Copier Model Bizhub 206
५	दिवाणी न्यायालय(क.स्तर), कणकवली	Kyocera Digital Copy Model 2201
६	दिवाणी न्यायालय(क.स्तर), देवगड	Kyocera Digital Copy Model 2201
७	दिवाणी न्यायालय(क.स्तर), दोडामार्ग	Kyocera Digital Copy Model 2201
८	दिवाणी न्यायालय(क.स्तर), मालवण	Canon Model iR 2945

वर नमुद फोटो कॉपिअर यंत्रांच्या वार्षिक देखभाल व दुरुस्तीविषयक करारामध्ये पुढील अटी व शर्ती बंधनकारक असतील.

अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचे नावे असावे. सदर लखोटयावर **"फोटो कॉपिअर यंत्रांच्या वार्षिक देखभाल दुरुस्तीकरीता दरपत्रक "** असे नमूद असावे.

२) वार्षिक देखभाल दुरुस्ती करार हा १ वर्षाचे कालावधीकरीता असेल.

३) दरपत्रक सादर करणा–या विक्रेत्यांची वस्तू व सेवा करारांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

४) वार्षिक देखभाल दुरुस्ती करार करणा-या पुरवठादार यांनी फोटो कॉपिअर यंत्राची तक्रार नोंद करणेकरीता आपले संपर्क क्रमांक पुरवावयाचे असून, प्राप्त झालेल्या तक्रारींची त्वरीत दखल घेवून २४ तासांचे आत सदर तक्रारींचे निराकरण करावयाचे आहे.

५) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमुद करावा. तसेच कार्यालयीन दस्तऐवजी तयार करणेसाठी दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, आधारकार्ड,बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत व रद्द केलेला धनादेश दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

६) वार्षिक देखभाल कराराचा खर्च हा त्रैमासिक पद्धतीने (Quarterly Basis) अदा करणेत येईल. सदरचा खर्च तेव्हाच अदा केला जाईल जेव्हा सर्व तक्रारींचे निराकरण केले जाईल. तसेच देखभालीसाठी कोणतीही आगावू रक्कम दिली जाणार नाही.

७) लिहून देणार यांचेशी केलेला वार्षिक देखभाल दुरुस्ती करार हा समाधानकारक नसल्यास सदर करार हा कोणतीही आगावू नोटीस न देता रद्द करणेत येईल.

८) करार करणेबाबतचा सर्व खर्च हा यशस्वी दरपत्रकदार यांनी स्वतः करावयाचा आहे.

९) जाहीर नोटीसमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

१०) जर निविदा प्रक्रियेत कमीत कमी ३ वैध व्यापारी निविदांचे मूल्यांकन करणे शक्य झाले नसेल तर, अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग-ओरोस यांचा राहील.

तरी, इच्छुक पुरवठादार यांनी वरील अटी व शर्तीस अधीन राहून **दि.३१/०३/२०२६** पर्यंत आपली दरपत्रके जिल्हा न्यायालय , सिंधुदुर्ग येथे सादर करावीत.

23/03/2026

दिनांकः- २३/०३/२०२६

सहाय्यक अधीक्षक (वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

*****

म.जा.क्र.ग्रंथा./२२३५ सन २०२६
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस
दिनांकः- २३/०३/२०२६

प्रत माहितीसाठी व कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी सविनय सादर-

१. मा. दिवाणी न्यायाधीश(व.स्तर), सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश(क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई-मेल द्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
७. मा. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस यांचे नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता
८. डी.एस.ए. , जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता